MHAH220006832020

# नियमित दि. दावा क्र.१०६/२०२० मधील अर्ज नि.क्र.३० वरील आदेश (दि.२३/०२/२०२६)

**गोरख मोतीराम गदादे.**
**विरुद्ध**
**विश्वनाथ श्रीराम गदादे व इतर.**

प्रस्तुतचा अर्ज मयत वादीच्या वारसांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ क्रम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथनानुसार, वादीने सदरचा दावा प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकतीची मोजणी करुन मिळणेसाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दि.१३/०५/२०२१ रोजी वादी गोरख मोतीराम गदादे मयत झालेले आहेत. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यात सदर मयत वादीचे वारस १) महादेव गोरख गदादे व २) संतोष गोरख गदादे यांची नावे लिहून त्याअनुषंगाने दुरुस्ती करणे आवश्यक व गरजेचे आहे. प्रस्तावित दुरुस्तीन्वये दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. सबब, प्रस्तुत दाव्यात वादीच्या नावापूढे मयत वारस असे लिहून दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींच्या कथनानुसार, वादीचा दावा निरंतर मनाई हुकूमाचा असून मुखत्याराने दाखल केला आहे. वादीने सर्व वारस अर्जात नमुद केलेले नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले, सदरच्या अर्जासोबत प्रतिज्ञालेख दाखल केला आहे. अर्जदारांनी प्रतिज्ञापत्रावर कथन केले आहे की, ते स्वतः मयत वादी गोरख मोतीराम गदादे याचे वारस आहेत. त्यांनी अर्जामध्ये प्रस्तावित दुरुस्ती अन्वये वादीच्या नावापूढे मयत असे लिहून त्यानंतर १) महादेव गोरख गदादे व २) संतोष गोरख गदादे हे त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अशी दुरुस्ती अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादपत्रात मजकूर समाविष्ट करण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांच्या कथनानुसार वादी गोरख मोतीराम गदादे दि.१३/०५/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादीच्या वतीने सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत घेतलेली आहे.

५. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची मोजणी करुन मिळणेसाठी व मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. अर्जदारांनी शपथेवर ते स्वतः मयत वादी गोरख मोतीराम गदादे याचे वारस असल्याचे कथन केलेले आहे. सदर मयत वादीचे मृत्यूप्रमाणपत्र नि.क्र.३३/१ लगत दाखल केलेले आहे. सदर मयत वादीचे वारस वादपटलावर घेण्यास कायदेशीर बाधा नाही. त्यामुळे सदर मयत वादीचे कायदेशीर प्रतिनीधी वादपटलावर येणेकामी सदर अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. सबब, अर्जात नमुद प्रस्तुतच्या दुरुस्त्या दाव्याचे सरनाम्यात करण्याबाबतचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.३०) मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदारांनी प्रस्तुत अर्जात मागणी केलेप्रमाणे वाद पत्रात मयत वादी गोरख मोतीराम गदादे यांचे कायदेशीर वारस वादपटलावर घेण्याची परवानगी त्यांनी प्रतिवादींना खर्च र.रु.३००/– प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या अटीवर देण्यात आलेली आहे. अर्जदारांनी सदर पुर्तता करुन वाद पत्रात आवश्यक दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तद्नंतर तात्काळ सादर कराव्यात.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.02.23 11:40:03 +0530

**ठिकाण –** कर्जत.
**दिनांक –** २३.०२.२०२६.

**(एस. एन. थापेकर)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**कर्जत**

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

न्यायालयाचे नाव : **श्री.एस. एन. थापेकर**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
न्यायालय क्र.१, कर्जत, जि.अहमदनगर.

लघुलेखकाचे नाव : **वैभव गो. घोगरे**
लघुलेखक (श्रेणी–३).

न्यायनिर्णय दिनांक : २३/०२/२०२६